# साखर

## ऊस उत्पादकांना गोड ठरावी; सहकार चळवळीचीही प्रकृती सुधारावी!



**सतीश देशमुख**
अध्यक्ष : इंटेलेक्च्युअल्स फोरम, पुणे
(मो.नं. ९८८१४९५५१८)



आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कच्च्या तेलाच्या किंमतीमध्ये विक्रमी घसरण झाल्यामुळे इथेनॉलची मागणी घटणार आहे. हे लक्षात घेऊन जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक देश ब्राझीलने आपले उत्पादन इथेनॉलवरून साखरेकडे वळवले आहे. या स्पर्धेमुळे व परदेशातील बिकट परिस्थितीमुळे आपली निर्यात ठप्प झाली आहे. तसेच स्थानिक पातळीवरील वरील साखरेचा खपही घटला आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, शासकीय स्तरावर ऊस उत्पादक तसेच सहकारी साखर कारखान्यांच्या दृष्टिकोनातून दरनिश्चितीविषयी सहानुभूतीपूर्वक निर्णय अपेक्षित आहे...

महाराष्ट्रात स्थापित साखर कारखान्यांची एकूण संख्या २४५ असून, त्यापैकी सन १८-१९ ला १०२ सहकारी, ९३ खासगी कारखाने सुरू होते तर ५० कारखाने बंद होते. महाराष्ट्राच्या ग्रामीण आर्थिक विकासाचा कणा असलेले हे सहकार चळवळीचे यशस्वी मॉडेल टिकले पाहिजे. सध्याच्या कोरोना संकटामुळे साखर कारखानदारी बिकट परिस्थितीतून जात आहे. सध्या देशभरात १६,८५० कोटी रुपयांची एफआरपीची रक्कम देणी थकली आहेत. यावरून त्याचा अंदाज येईल.

### एकूण मागणी घटल्याने चिंता

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये कच्च्या तेलाच्या किंमतीमध्ये विक्रमी घसरण झाल्यामुळे इथेनॉलची मागणी घटणार आहे. हे लक्षात घेऊन जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक देश ब्राझीलने आपले उत्पादन इथेनॉलवरून साखरेकडे वळवले आहे. या स्पर्धेमुळे व परदेशातील बिकट परिस्थितीमुळे आपली निर्यात ठप्प झाली आहे. तसेच स्थानिक पातळीवरील वरील साखरेचा खपही घटला आहे. केंद्राने विविध योजनांतर्गत कारखान्यांना द्यावयाची अनुदानाची १२,८०० कोटी रु. रक्कम दोन वर्षांपासून थकली आहे. यासाठी अर्थसंकल्पात केलेली ४६०० कोटी रुपयांची तरतूदही अपुरी आहे. अशा रितीने साखर उत्पादनात, जागतिक पातळीवरील क्रमांक एकचा आपला देश संकटाच्या विळख्यात अडकला आहे.

### 'एफआरपी' मध्ये (रास्त व किफायतशीर दर) घट

एफआरपीमध्ये गेले अनेक वर्ष नगण्य वाढ झालेली आहे. उदाहरणार्थ सन १४-१५ मध्ये दहा रुपये प्रतिक्विंटल, सन १५-१६ मध्ये दहा रुपये प्रतिक्विंटल, सन १६-१७ व सन १९-२० मध्ये काहीच वाढ नाही.

सन १८-१९ ला एफआरपी २७५ रुपये प्रतिक्विंटल केली आहे. पण त्यासाठी बेस, मूलभूत साखर उतारा ८.५ % वरून १०% नेऊन दिशाभूल करण्यात आली आहे. तरतूद अशी आहे.

* २७५ रु. प्रति किं., १०% उतारा, ०.१ वृध्दीसाठी २.७५ रू. प्रिमियम जास्त.

* २७५ रु. प्रति किं., ९.५ ते १०% उतारा, ०.१% घटीसाठी २.७५ रू. कमी.

* २६१.२५ रु. प्रति किं., ९.५% उताऱ्यापेक्षा कमी.

अशी घटीची नवीन कायदेशीर तरतूद सुरू केल्यामुळे काही कारखाने साखर उतारा कमी दाखवून चुकीचा पायंडा पाडत आहेत व शेतकऱ्यांना कमी रक्कम देत आहेत.



केंद्र सरकारने जाहीर केलेले हे दर 'सीएसीपी'ने शिफारस केलेल्या दरापेक्षा कमी असतात. उदाहरणार्थ सन १५-१६ मध्ये राज्य सरकारने २५२ रुपये प्रतिक्विंटल शिफारस केली होती. त्यावेळी केंद्राने एफआरपी २३० रुपये प्रतिक्विंटल जाहीर केला होता. प्रत्यक्षात उत्पादन खर्च २९० रुपये प्रतिक्विंटल आहे.

### ऊस (नियंत्रण) आदेश १९६६

Sugarcane (Control)

कारखान्यातील उपपदार्थ जसे ३% प्रेसमड ज्याचा मिश्रखतासाठी किंवा विक्रीसाठी वापर होतो, ४% मळी ज्याचे मूल्यवर्धन करून मद्यार्क व इथेनॉल बनवतात व २९% बगॅस ज्याच्यापासून सहवीजनिर्मिती होते. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती भार्गव यांच्या शिफारशीनुसार या उपपदार्थांच्या विक्रीतील नफा कारखान्यांनी ५०% व ऊस उत्पादकांनी ५०% असा वाटून घ्यावा असे होते. त्याप्रमाणे वरील कायद्यात ५- हे कलम १९७४ साली टाकले होते. परंतु आवश्यक वस्तू कायद्याने दिलेल्या अधिकारान्वये, २२/१०/२००९ रोजी सरकारने नोटिफिकेशन क्र. SO२६६५(ए) द्वारे हे महत्त्वाचे कलम ५- व दुसरे परिशिष्ट काढून टाकले आहे.

कायद्याच्या कलम ३ मध्ये जरी असे लिहिले आहे की उपउत्पादन मूल्य एफआरपी परिगणना करण्यासाठी एक निकष आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. कारण प्रत्येक कारखान्याची प्रक्रिया उद्योग व नफे वेगळे आहेत. रंगराजन समितीच्या सूत्राप्रमाणे उपपदार्थांच्या विक्रीतील फायदा -

आर.एस.एफ. हा एफआरपी पेक्षा जास्त असेल तर तो शेतकऱ्यांना देणे अपेक्षित आहे. पण ही तरतूद कागदावरच राहिलेली आहे.

एखाद्या कारखान्याने उसापासून डायरेक्ट इथेनॉलनिर्मिती केल्यास त्याचा शेतकऱ्यांना लाभ कसा द्यावा यासाठी कायद्यात काहीच तरतूद केलेली नाही.

### साखरेचा दर व ग्राहकांची संकुचित मानसिकता

गेली कित्येक वर्षात इतर वस्तूंच्या किंमतीमध्ये पटीने झाली असून साखरेच्या किमतीत नगण्य वाढ झाली आहे. नव्हे उलट महागाईच्या निर्देशंकाप्रमाणे घटच म्हणावी लागेल. दोन वर्षांपूर्वी २९ रुपये प्रतिकिलो असलेल्या साखरेचा किमान विक्री दर केवळ ३१ रुपये केला आहे. ही केवळ दोन रुपयांची वाढ! यातून काय साधणार? साखर अत्यावश्यक वस्तू कायद्यामध्ये विनाकारण टाकून त्याचे भाव नियंत्रित ठेवण्यात आले आहेत. इतर महागाई चिडीचूप सहन करणाऱ्या शहरी ग्राहकांना शेतमालाचे भाव वाढले की चेव येतो व मग बोंब सुरू होते. प्रस्तुत लेखकाने हा मुद्दा बऱ्याच वेळा मांडला आहे की ग्राहकांच्या या संकुचित मानसिकतेमध्ये बदल करणे हे आव्हानात्मक काम आहे; मात्र ते अनिवार्य आहे.



### साखरेचा द्विस्तरीय दर- काळाची गरज

बऱ्याच वर्षांपासून मी ही मागणी करीत आहे की साखरेला द्विस्तरीय किंमत लागू करण्यात यावी.

एक भाव औद्योगिक प्रक्रिया व्यवसायांसाठी जसे शीतपेये, औषधे, आईस्क्रिम, बिस्किट, केक, चॉकलेट, मिठाई वगैरे बनविणाऱ्यांसाठी. या क्षेत्राचा साखरेचा खप ८३% आहे. या उद्योगाचा नफा- प्रॉफिट मार्जिन ६०% ते ३२०% इतके प्रचंड आहे.



दुसरा भाव घरगुती वापर करणाऱ्या (लाडावलेल्या) ग्राहकांसाठी. त्यांना साधारणपणे १७% साखर लागते.

याची सुरुवात कारखान्यापासूनच वर्गीकरण पद्धतीची अंमलबजावणी करून सहज शक्य आहे. साखर कारखान्यांनी उत्पादनाचे प्रक्रिया करताना कराराप्रमाणे निर्यातक्षम साखर गुणवत्ता वेगळी, उरलेल्या उत्पादनापैकी ७०% साखर लहान आकाराची (एस२ -३०) औद्योगिक वापरासाठी व ३०% साखर मोठ्या आकाराची (एम-३०) घरगुती वापरासाठी निर्माण होऊ शकते. त्याच्या दाण्याचा रंग वेगळा किंवा बॅगचे कलर कोडिंग, त्याला 'डोमेस्टिक' व 'कमर्शिअल' असे चिन्हांकित करता येईल.

घरगुती साखरेसाठी ५% व औद्योगिक वापरासाठी १२% जीएसटी लावता येईल. जेणेकरून अंमलबजावणी सुलभतेने होऊन भ्रष्टाचार होणार नाही.

गॅस सिलेंडर व वीज ग्राहकांच्या बाबतीत असा फरक करण्याचा यशस्वी अनुभव आपल्याकडे आहे, गरज आहे ती राजकीय इच्छाशक्तीची.

### आमच्या मागण्या अशा आहेत

* एफआरपी दर ४५० रु. प्रति क्विं., मूलभूत ९.५ % साखर उतारासाठी, ०.१% वृध्दीसाठी ४.५ रू. प्रिमियम जास्त.
* उताऱ्यामधील घटीसाठी काहीही बदल नसावा.
* घरगुती वापरासाठी साखरेचा दरः ४५ रू./ किलो.
* औद्योगिक वापरासाठी साखरेचा दरः ६८ रू./ किलो.

ऊस हे एकमेव नगदी पीक आहे ज्याच्या किमतीमध्ये निश्चितता असते. साखर उद्योग स्वयंसिद्ध (Self Sustainable) होण्यासाठी प्रयत्न होणे जरुरी आहे. जेणेकरून राज्य किंवा केंद्राकडून कर्ज व अनुदान मागण्याची गरज भासणार नाही.

असे केल्याने साखर कारखान्यांची भरभराट होईल तसेच शेतकरी, कारखान्यातील कर्मचारी, ऊसतोड कामगार व या क्षेत्रातील निगडित कष्टकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावेल.

वरील प्रस्ताव मी मुख्यमंत्री, पंतप्रधान, संबंधित मंत्र्यांना तसेच इतर साखर उद्योगाशी संबंधित असलेल्या संस्था, ISMA व साखर कारखाने यांना पाठवलेला आहे. ■